# प्रेस नोट दिनांक १८/०६/२०१९
# चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर
# एटीएम मशिनमध्ये पैसे भरणारे मॅनेजरनेच पैशांचा अपहार केले बाबत.

चंदननगर पो.स्टे. गु.रजि.नं २००/२०१९ भा.द.वि.कलम ४०८, ४२० मधील फिर्यादी श्री. संदीप सुधाकर केतकर, रा.प्लॅट नं १०, ८ ए, लक्ष्मीनारायण नगर - ४, एंरडवणे पुणे हे सिक्युअर व्हॅल्यु इंडिया लिमिटेड प्रिन्स टॉवर ग्राऊंड प्लोअर नगर रोड पुणे येथील कार्यालय मध्ये ऑपरेशन मॅनेजर म्हणुन काम पाहात आहे. कंपनीतर्फे पुणे विभागातील विविध बँकेचे एटीएम मशीन मध्ये पैसे भरण्याचे सुविधा देत आहेत. कंपनीने पुरविलेल्या कॅश व्हॅन सोबत एटीएम अधिकारी गनमन चालक असे सर्वजण कार्यरत असुन कॅश व्हॅन सोबतचा स्टाफ असे बॅकेचे इंडेट प्रमाणे कॅश भरणा करण्यासाठी कार्यालयातून संबधीत बँकेत जात असतात. संबधीत करन्सी एटीएम अधिकारी इंडेट प्रमाणे बँकेतुन कलेक्ट करुन संबधीत बॅकांचे ए टी एम मशीन मध्ये भरणा करीत असतात. तसेच सदरचे पैसे एटीएम मशीन मध्ये भरणा केले बाबत मॅनेजर यांना रिपोर्ट करत असतात.

दिनांक ०२/०६/२०१८ रोजी कंपनीद्वारे नेमणुक करण्यात आलेला सुमित कुँवरसिंग राजपुत, वय २५ वर्षे, रा. शिवणे, एनडीए रोड, मनीषा थिएटरच्या मागे, साईप्रसाद बिल्डींग, सदनिका नंबर ०९, शिवणे याने एकुण रोख रक्कम रुपये ५२ लाख रुपये कॅश घेवुन बॅकांचे इंडेट प्रमाणे संबधीत बँकाचा एटीएम मशीन मध्ये रुपये भरणा न करता कमी रक्कम भरुन २२,८७,३००/- रुपये अपहार केला. बँकेने ऑडीट केले नंतर वरील रक्कम कमी भरणा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याने सदरची रक्कम कमी भरल्याचे सांगुन १० लाख ५० हजार रुपये कंपनीत जमा केले. उर्वरीत रक्कम १२, ३७,३००/- रुपये कंपनीत न भरता त्याचा स्वतःच्या अर्थिक फायदयासाठी अपहार केला आहे. सदरचा आरोपी गुन्हा घडले पासुन फरारी होता दिनांक १७/६/२०१९ रोजी चदंननगर पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे पोलीस स्टाफने त्यास अटक केली असुन त्यांचेकडे अपहारीत रकमेबाबत पोउनि. श्रीधर भोसले हे तपास करीत आहेत.

सदरची कामगीरी मा. श्री. प्रसाद अक्कानवरु साो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, डॉ. श्री. शिवाजी पवार साो, सपोआ. येरवडा विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक - कृष्णा इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक - श्रीधर भोसले, पोहवा. पंडीत गावडे, पो.हवा. हरी कदम, पो.शि. प्रशांत दुधाळ, पो. शि. सुभाष आव्हाड यांनी केली आहे.